पावसाच्या पार्श्वभूमीवर शासकीय यंत्रणा २४ बाय ७ 'अलर्ट मोड'वर ठेवा : मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस >>पान 2

नांदेड-मुंबई व टनकपूर-नांदेड दरम्यान दोन नवीन एक्सप्रेस गाड्यांना हिरवा झेंडा >>पान 3

बुलढाणा पोलिसांची दमदार कामगिरी; ७.५० लाखांचे ५० हरवलेले मोबाईल मूळ मालकांच्या हाती >>पान 4


सुविचार
सत्तेपेक्षा सामर्थ्य महत्त्वाचे असते.


# दैनिक आपला विदर्भ

apalavidarbhlivenews@gmail.com

मुख्य संपादक : देविदास खनपटे मो. 9767233034

■ बुलढाणा ■ वाशिम ■ यवतमाळ ■ अमरावती ■ वर्धा ■ नागपूर ■ गोंदिया ■ भंडारा ■ चंद्रपूर ■ गडचिरोली ■ छत्रपती संभाजीनगर ■ मुंबई

■ दैनिक ■ बुलडाणा ■ वर्ष 05 ■ अंक 04 ■ मंगळवार, दि. 07 जुलै 2026 ■ पाने 4 ■ किंमत रू. 2 ■ RNI.NO.MAHMAR/2023/88006





आकांक्षा म्हणते... 'लग्नापूर्वी मी बायसेक्शुअल होते...' आतील पान


# नाशिकवर ढगफुटीचं संकट!

## आज त्र्यंबकेश्वर अन् सप्तश्रृंगी मंदिर भाविकांसाठी बंद; शाळा-महाविद्यालयांना सुट्टी, मुख्यमंत्र्यांच्या इशाऱ्यानंतर जिल्हाधिकाऱ्यांचे मोठे आदेश

दैनिक आपला विदर्भ

**नाशिक। प्रतिनिधी :** नाशिक आणि त्र्यंबकेश्वर परिसरासाठी ७ जुलै रोजी ढगफुटीची दाट शक्यता वर्तवण्यात आली आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी एकाच दिवसात ३०० मिमी इतका विक्रमी पाऊस कोसळण्याचा अंदाज जाहीर केल्यानंतर संपूर्ण नाशिक जिल्हा प्रशासन हायअलर्टवर आले आहे. या संभाव्य नैसर्गिक आपत्तीच्या पार्श्र्वभूमीवर नाशिकचे जिल्हाधिकारी आयुष प्रसाद यांनी ग्रामीण पोलीस अधीक्षक डी. एस. स्वामी आणि जलसंपदा विभागाच्या अधिकाऱ्यांच्या उपस्थितीत तातडीची पत्रकार परिषद घेऊन मोठे निर्णय जाहीर केले आहेत. प्रवाशांच्या आणि भाविकांच्या सुरक्षेचा विचार करून आज रात्रीपासूनच त्र्यंबकेश्वर ज्योतिर्लिंग मंदिर आणि सप्तशृंगी मंदिर परवापर्यंत भाविकांसाठी पूर्णपणे बंद ठेवण्याचा निर्णय प्रशासनाने घेतला आहे.




पत्रकार परिषदेत सविस्तर माहिती देताना जिल्हाधिकारी आयुष प्रसाद म्हणाले की, ढगफुटी पाऊस वॉर्निंग ७ जुलैला आहे, ती त्र्यंबकेश्वर, इगतपुरी आणि नाशिक- त्र्यंबकेश्वर दरम्यानच्या भागात आहे. नाशिकचा पेठ तालुका या भागातही हा इशारा आहे. नाशिक, इगतपुरी आणि त्र्यंबकेश्र्वर या तालुक्यात जास्त पाऊस होणार आहे. त्यामुळे नाशिक, इगतपुरी आणि त्र्यंबकेश्वर तालुक्यातील आठवडे बाजार आणि शाळा-महाविद्यालयांना सुट्टी जाहीर करण्यात आली आहे.

शेतकऱ्यांनीही उद्या शेतीच्या कामासाठी बाहेर न पडता घरीच थांबावे. खबरदारी म्हणून काही रस्ते पूर्णपणे बंद ठेवण्यात येणार आहेत. आज रात्रीपासून त्र्यंबकेश्र्वर देवस्थान बंद राहणार असून परवापर्यंत मंदिर बंद राहील. सप्तश्रृंगी गड येथेही ६५ मिलिमीटर पाऊस होण्याचा अंदाज आहे, तिथे जरी जास्त पाऊस नसला तरी सुरक्षेचा उपाय म्हणून सप्तश्रृंगी मंदिरही बंद राहणार आहे. नद्यांचा फ्लो कायम राहील, त्यामुळे नदीपात्रात कुठे अडथळा असेल तर ते दूर करण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. पूरग्रस्त भागातील पशुधनाचे गोठे स्थलांतरित करण्याच्या सूचना आहेत. ज्या गावांमध्ये दगड किंवा दरड पडण्याची शक्यता आहे, अशा गावांना आधीच सूचना देण्यात आल्या आहेत, अशी माहिती त्यांनी दिली.

**शाळा महाविद्यालयांना सुट्टी**




जिल्हाधिकारी आयुष प्रसाद पुढे म्हणाले की, पेठ, दिंडोरी, नाशिक ग्रामीण, त्र्यंबकेश्वर, इगतपुरी येथील शाळा आणि महाविद्यालये पूर्णपणे बंद राहतील. धबधब्यांच्या ठिकाणी विशेष सुरक्षा कर्मचारी तैनात राहतील. तसेच छोटे पूल आणि साकव परिसरात कर्मचारी सतर्क राहणार आहेत. इगतपुरी भागातील रेल्वे विभागाला हवामानाच्या परिस्थितीबाबत सूचना देण्यात आल्या आहेत. कोणतीही दुर्घटना घडणार नाही याची पूर्ण काळजी घेतली जात आहे. गड, किल्ले आणि धबधब्यांच्या ठिकाणी नागरिकांनी अजिबात जाऊ नये. पोलीस आणि आपत्ती व्यवस्थापन यांची कंट्रोल रूम तयार आहे. स्थानिक स्वराज्य संस्थांची मदत घेतली जाणार आहे.

### वर्क फ्रॉम होम न देणाऱ्या खासगी कंपन्यांना देवेंद्र फडणवीस यांचे आवाहन

**मुंबई । प्रतिनिधी :** मुंबईसह राज्यभरात तुफान पाऊस पडतो आहे. मुंबई, पुणे, नाशिक भागांमध्ये पावसाच्या सरी जोरदार पडत आहेत. तसंच पालघर, रायगड, रत्नागिरी या जिल्ह्यांमध्येही जोरदार पाऊस पडतो आहे. नाशिकमध्ये मंगळवारी ढगफुटी होण्याची शक्यता आहे. तसंच ८ जुलैपर्यंत पावसाची ही स्थिती अशीच राहणार आहे असं मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आढावा बैठकीनंतर झालेल्या पत्रकार परिषदेत सांगितलं. तसंच वर्क फ्रॉम बाबत जो प्रश्न विचारण्यात आला त्यावरही त्यांनी उत्तर दिले. खासगी आस्थापना वर्क फ्रॉम होम देत नाहीत अशी स्थिती दिसते आहे असे विचारले असता मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी म्हटलंय की, आपले कर्मचारी आहेत त्यांची जबाबदारी ही खासगी कार्यालयांनी, आस्थापनांनी स्वीकारली पाहिजे. आपल्या कर्मचाऱ्यांची त्यांच्या जिवीताची जबाबदारी ही सगळ्या आस्थापनांची आहे.

### मुसळधार पावसाने पुणे विमानतळावरील उड्डाणे विस्कळीत!

**पुणे । प्रतिनिधी :** गेल्या काही तासांपासून सतत कोसळत असलेल्या मुसळधार पावसामुळे पुणे विमानतळावरील उड्डाणे विस्कळीत झाली असून, दोन विमानांच्या वेळेत बदल करण्यात आले, तर काही विमान उड्डाणांना उशीर झाल्याची माहिती विमानतळ प्रशासनाकडून देण्यात आली.

सोमवारी (६ जुलै) सकाळपासूनच ढगाळ वातावरण आणि दृश्यमानता कमी असल्याने अनेक विमानांच्या येण्याच्या आणि उड्डाणाच्या वेळेत बदल करण्यात आले. आता दुपारपासून हवामानात सुधारणा झाली असून, परिस्थिती पूर्ववत होत असल्याचेही विमानतळ प्रशासनाकडून स्पष्ट करण्यात आले.

### रायगड, रत्नागिरीसह राज्यातील पूरस्थितीचा महिला व बालविकास मंत्री तटकरे यांनी घेतला आढावा

**मुंबई । प्रतिनिधी :** राज्यात सुरू असलेल्या मुसळधार पावसाच्या पार्श्र्वभूमीवर महिला व बाल विकास मंत्री आदिती तटकरे यांनी मंत्रालयातील राज्य आपत्कालीन कार्य केंद्रात आपत्ती व्यवस्थापन विभागाचे संचालक श्री. भालचंद्र चव्हाण यांच्याकडून रायगड, रत्नागिरीसह राज्यातील पूरस्थितीचा सविस्तर आढावा घेतला.

## अतिवृष्टीमुळे घडलेल्या घटनांची चौकशी होणार; नागरिकांनी सतर्क राहावे-मंत्री गिरीष महाजन

दैनिक आपला विदर्भ

**मुंबई । प्रतिनिधी :** राज्यात सुरू असलेल्या अतिवृष्टीमुळे विविध ठिकाणी दरडी कोसळणे, झाडे पडणे आणि इमारतींचे नुकसान अशा घटना घडत असून, अशा सर्व घटनांची सखोल चौकशी करण्याचे आदेश दिले आहेत,नागरिकांनी सतर्क रहावे व अत्यावश्यक कामाशिवाय घराबाहेर पडू नये, असे आपत्ती व्यवस्थापन मंत्री गिरीष महाजन यांनी विधान परिषदेत सांगितले.

मंत्री महाजन म्हणाले की, अतिवृष्टीमुळे दरडी कोसळणे ही नैसर्गिक आपत्ती असून, ज्या ठिकाणी बोगदे, रस्ते किंवा इतर ठिकाणी दरडी कोसळल्या आहेत, त्या सर्व घटनांची चौकशी केली जाईल. राज्यभरात; तसेच मुंबई महानगरपालिकेकडून आवश्यक त्या सर्व प्रतिबंधात्मक उपाययोजना करण्यात येत आहेत. झाडांच्या छाटणीसह धोकादायक ठिकाणांवर मनुष्यबळ तैनात करण्यात आले असून, राष्ट्रीय आपत्ती प्रतिसाद दल आणि राज्य यंत्रणा सतर्क आहे.

राज्यात काही भागांत विक्रमी



पाऊस झाला असून, विशेषतः मुंबई, रायगड आणि कोकण पट्ट्यात अतिवृष्टीचा मोठा फटका बसला आहे. गेल्या तीन-चार दिवसांत राज्यात १३ जणांचा मृत्यू झाला आहे. त्यामध्ये मानखुर्दमधील दुर्घटनेतील सहा मृत्यूंचा समावेश आहे, असे त्यांनी सांगितले.

मानखुर्द येथील दुर्घटनेनंतर आपण तातडीने घटनास्थळी भेट दिली होती. तेथील परिस्थिती अत्यंत गंभीर होती. वर्षानुवर्षे धोकादायक अवस्थेत असलेल्या परिसरात नागरिक वास्तव्यास असल्याने प्रशासनासमोर मोठे आव्हान निर्माण झाले आहे. धोकादायक इमारती खाली करण्यासाठी नोटिसा दिल्यानंतरही पर्यायी निवासाचा प्रश्न निर्माण होत असल्याने अनेक नागरिक स्थलांतरास तयार होत नाहीत. त्यामुळे अशा दुर्घटना टाळण्यासाठी प्रशासन आणि नागरिकांनी परस्पर सहकार्य करणे आवश्यक असल्याचे त्यांनी नमूद केले.

अतिवृष्टीच्या पार्श्वभूमीवर नागरिकांनी अत्यावश्यक कामाशिवाय घराबाहेर पडू नये, खाजगी कार्यालयांनी शक्य असल्यास वर्क फॉर्म होमचा अवलंब करावा आणि परिस्थितीनुसार शाळा-महाविद्यालयांना सुट्टी देण्याचे निर्णय घेण्यात आले आहेत. गेल्या दोन-तीन दिवसांत अतिवृष्टीमुळे घडलेल्या घटनाबाबत उद्या मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस सविस्तर निवेदन करतील, असेही मंत्री महाजन यांनी स्पष्ट केले.

अतिवृष्टीने सर्व जणांनी सतर्क राहून शासनाला मदत करावी. राज्यातील अतिवृष्टीची परिस्थिती पाहता आजचे कामकाज स्थगित करत आहोत, असे विधान परिषद सभापती प्रा. राम शिंदे यांनी सांगितले.

## आपत्कालीन परिस्थितीत हेल्पलाईन क्रमांकावर संपर्क करण्याचे मुख्यमंत्र्यांचे आवाहन

**मुंबई । प्रतिनिधी :** राज्यात उद्भवलेल्या संभाव्य पूरपरिस्थिती आणि मुसळधार पावसाच्या पार्श्वभूमीवर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी राज्यातील जनतेला पूर्णपणे सतर्क राहण्याचे आणि प्रशासनाला सहकार्य करण्याचे आवाहन केले आहे.

राज्यात कोणत्याही प्रकारची आपत्कालीन परिस्थिती निर्माण झाल्यास नागरिकांना तातडीने मदत मिळावी, यासाठी राज्य सरकारची संपूर्ण यंत्रणा सज्ज असून २४ तास कार्यरत असणारे नियंत्रण कक्ष सुरू करण्यात आले आहेत. नागरिकांनी कोणत्याही अफवांवर विश्वास न ठेवता केवळ अधिकृत सूत्रांकडून येणाऱ्या माहितीचा आधार घ्यावा आणि संकटसमयी जाहीर केलेल्या अधिकृत हेल्पलाईन क्रमांकांवर त्वरित संपर्क साधावा, असे मुख्यमंत्र्यांनी स्पष्ट केले आहे.

राज्यस्तरीय मुख्य नियंत्रण कक्षाशी संपर्क साधण्यासाठी १०७० हा टोल-फ्री क्रमांक कार्यान्वित करण्यात आला असून, नागरिक ०९३२१५८७१४३ या भ्रमणध्वनी क्रमांकावर किंवा ०२२-२२०२७९९० आणि ०२२-२२७९४२२९ या दूरध्वनी क्रमांकांवर देखील थेट संपर्क साधू शकतात. याशिवाय, प्रत्येक जिल्ह्यामध्ये स्थानिक पातळीवर जलद गतीने मदत कार्य राबवण्यासाठी आणि परिस्थितीवर तात्काळ नियंत्रण मिळवण्यासाठी जिल्हास्तरीय नियंत्रण कक्षही सज्ज ठेवण्यात आले आहेत, ज्यांचा मुख्य संपर्क क्रमांक १०७७ असा आहे, असेही आवाहन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केले आहे.

दरड कोसळण्याची शक्यता असलेल्या संवेदनशील क्षेत्रांतील नागरिकांच्या सुरक्षिततेची योग्य ती काळजी घेण्याच्या सूचना प्रशासनाला देण्यात आल्या आहेत. कोणत्याही आपत्कालीन प्रसंगी नागरिकांनी अजिबात न घाबरता या जाहीर केलेल्या हेल्पलाईन क्रमांकांवर संपर्क साधून प्रशासकीय यंत्रणेची मदत घ्यावी, असे आवाहन मुख्यमंत्र्यांनी केले आहे.

### आळंदी व देहू येथे येणाऱ्या वारकऱ्यांनी पुण्यातच वारीमध्ये सहभागी व्हावे; मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे आवाहन

**मुंबई । प्रतिनिधी :** इंद्रायणी नदीला मोठ्या प्रमाणात पूर आला असून आळंदी शहरात प्रवेश करणारे नदीवरील चारही पूल पाण्याखाली गेले आहेत. त्यामुळे सध्या आळंदी शहरात येणे सुरक्षित नाही. ज्या वारकरी व भाविकांनी आळंदीच्या दिशेने प्रवास सुरू केला आहे, त्यांनी ज्या ठिकाणी आहात, त्या ठिकाणीच सुरक्षित थांबावे. देहू व आळंदी येथे न जाता पुणे शहरात वारीमध्ये सहभागी व्हावे, असे आवाहन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केले आहे.



मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले, प्रशासन, पोलीस यंत्रणा व आपत्ती व्यवस्थापन विभागाच्या सूचनांचे काटेकोरपणे पालन करावे. अफवांवर विश्वास ठेवू नये तसेच नदीपात्र, घाट परिसर व बंद करण्यात आलेल्या पुलांकडे जाणे टाळावे. आपल्या सुरक्षिततेसाठी प्रशासन आवश्यक ती सर्व उपाययोजना करत आहे. सर्वांनी संयम बाळगून प्रशासनाला सहकार्य करावे. काही वारकरी बांधव पुणे शहरापर्यंत आले असल्यास त्यांनी पुणे शहरातच थांबावे, असेही आवाहन मुख्यमंत्र्यांनी यावेळी केले.

## मुंबईतील झाड दुर्घटनांनंतरही डोणगावातील धोकादायक झाडांकडे दुर्लक्ष

### प्रशासन जागे होणार कधी? नागरिकांकडून तातडीच्या छाटणीची मागणी

दैनिक आपला विदर्भ

**डोणगाव । प्रतिनिधी :** मुंबईत मुसळधार पावसामुळे झाडे व मोठ्या फांद्या कोसळण्याच्या घटनांमध्ये वाढ झाली असून, बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या नियंत्रण कक्षात एका दिवसात ९१ झाडे व फांद्या कोसळल्याच्या तक्रारी नोंद झाल्या आहेत. या पार्श्वभूमीवर बुलढाणा जिल्ह्यातील डोणगाव व परिसरातील धोकादायक झाडे आणि सुकलेल्या फांद्यांकडे संबंधित प्रशासनाचे दुर्लक्ष होत असल्याची भावना नागरिकांनी व्यक्त केली आहे.

अलीकडील पावसामुळे डोणगावातील काही ठिकाणी झाडांच्या मोठ्या फांद्या





तुटून रस्त्यावर पडल्याच्या घटना घडल्या आहेत. सुदैवाने या घटनांमध्ये कोणतीही जीवितहानी झाली नसली, तरी भविष्यात मोठी दुर्घटना होण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्यामुळे नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. स्थानिक नागरिकांच्या म्हणण्यानुसार, धोकादायक अवस्थेतील झाडांची पाहणी करून छाटणी करण्याची मागणी अनेकदा करण्यात आली आहे. मात्र, त्याकडे अपेक्षित गांभीर्याने लक्ष दिले जात नसल्याचा आरोप केला जात आहे. मुंबईतील दुर्घटनांमधून धडा घेत प्रशासनाने तातडीने उपाययोजना कराव्यात, अशी मागणी जोर धरत आहे.

नागरिकांनी डोणगाव व परिसरातील धोकादायक झाडांचे सर्वेक्षण करून त्वरित छाटणी करावी, सार्वजनिक ठिकाणांवरील झाडांची नियमित तपासणी करावी आणि संभाव्य दुर्घटना टाळण्यासाठी प्रतिबंधात्मक उपाययोजना राबवाव्यात, अशी मागणी केली आहे. दरम्यान, हवामान विभागाने पुढील काही दिवस राज्यातील अनेक भागांत मुसळधार पावसाचा इशारा दिला आहे. त्यामुळे नागरिकांनीही मोठ्या झाडांखाली थांबणे टाळावे, वादळी वाऱ्याच्या वेळी अनावश्यक प्रवास टाळावा आणि प्रशासनाच्या सूचनांचे पालन करावे, असे आवाहन करण्यात आले आहे.



## एआय : तंत्रज्ञानाच्या सहाय्याने समीकरण बदलणार

एका कंपनीचे बाजारमूल्य जगातील बहुतांश देशांच्या अर्थव्यवस्थेपेक्षा मोठे असू शकते, यावर काही वर्षांपूर्वी विश्र्वास बसला नसता; पण कृत्रिम बुद्धिमत्ता (एआय) क्षेत्रातील आघाडीची कंपनी एनव्हिडियाने नुकताच पाच ट्रिलियन डॉलरचा ऐतिहासिक टप्पा गाठला आहे. अमेरिका आणि चीन वगळता जर्मनी, जपान, भारत, ब्रिटन, फ्रान्स अशा जवळपास सर्व देशांच्या वार्षिक जीडीपीपेक्षा या एका कंपनीचे बाजारमूल्य अधिक आहे. अर्थात, कंपनीचे बाजारमूल्य आणि देशाचा जीडीपी यांची थेट तुलना करता येत नाही, तरीही या आकड्यामुळे एनव्हिडियाने जागतिक अर्थव्यवस्थेत मिळवलेले स्थान स्पष्ट होते.हा विक्रम केवळ वॉल स्ट्रीटवरील उत्सव नाही. तो जागतिक आर्थिक आणि राजकीय सत्तेच्या बदलत्या केंद्रांचा संकेत आहे. एकेकाळी तेलसंपत्तीवर जगाची सत्ता अवलंबून होती. आज तीच भूमिका संगणकीय चिप्स आणि 'कम्प्युटिंग पॉवर'ने घेतली आहे. एनव्हिडियाचे यश केवळ शक्तिशाली चिप्स बनवण्यात नाही. कंपनीची खरी ताकद तिच्या संपूर्ण तंत्रज्ञान परिसंस्थेत आहे. एआय विकसित करणाऱ्या लाखो संशोधक, स्टार्टअप्स आणि बहुराष्ट्रीय कंपन्या तिच्या हार्डवेअरबरोबरच 'क्युडा' या सॉफ्टवेअर प्लॅटफॉर्मवर अवलंबून आहेत. त्यामुळे एआयच्या जगात प्रवेश करायचा असेल, तर एनव्हिडियाला वळसा घालणे आज जवळपास अशक्य आहे. भविष्यातील डिजिटल महामार्गावर जणू या कंपनीने टोल नाकाच उभारला आहे.या कहाणीचा दुसरा भाग अधिक महत्त्वाचा आहे. एनव्हिडिया चिप्सची रचना अमेरिकेत होते; मात्र त्यांचे उत्पादन मुख्यतः तैवानमध्ये होते. त्यामुळे तैवानभोवती निर्माण होणारा कोणताही तणाव जागतिक तंत्रज्ञान उद्योगाला हादरा देऊ शकतो. त्यातच अमेरिकेने चीनला अत्याधुनिक एआय चिप्सच्या निर्यातीवर घातलेले निर्बंध दाखवून देतात की, सिलिकॉन हा आता केवळ व्यापाराचा विषय राहिलेला नाही. तो राष्ट्रीय सुरक्षा आणि जागतिक सत्ता संतुलनाचा महत्त्वाचा घटक बनला आहे. या पार्श्र्वभूमीवर भारतानेही योग्य दिशेने पावले टाकण्यास सुरुवात केली आहे. सेमीकंडक्टर उत्पादनासाठी विशेष प्रोत्साहन योजना, गुजरातसह विविध राज्यांमध्ये उभारले जाणारे चिप प्रकल्प आणि 'इंडिया एआय मिशन'अंतर्गत उभारली जात असलेली उच्च क्षमतेची जीपीयू संगणकीय सुविधा ही त्याची उदाहरणे आहेत. भारतीय संशोधक, स्टार्टअप्स आणि उद्योगांना जागतिक स्पर्धेसाठी आवश्यक संगणकीय पायाभूत सुविधा देशातच उपलब्ध करून देण्याचा हा प्रयत्न आहे. तथापि, भारताची खरी संधी केवळ चिप उत्पादनात नाही. चिप डिझाईन, एआय डेटा सेंटर्स, क्लाऊड इन्फ्रास्ट्रक्चर, ऊर्जा कार्यक्षम संगणकीय व्यवस्था आणि भारतीय भाषांमध्ये विकसित होणाऱ्या सॉव्हरिन एआय'मध्ये भारत जागतिक नेतृत्व मिळवू शकतो. कारण, भविष्यात कृत्रिम बुद्धिमत्ता केवळ तंत्रज्ञानाचा विषय राहणार नाही. ती आर्थिक वाढ, राष्ट्रीय सुरक्षा आणि जागतिक प्रभाव यांचे नवे मापदंड ठरणार आहे. एनव्हिडियाचा पाच ट्रिलियन डॉलरचा टप्पा हा एका कंपनीच्या यशाचा उत्सव नाही. तो जगातील संपत्ती, तंत्रज्ञान आणि सत्ता यांची व्याख्या वेगाने बदलत असल्याचा इशारा आहे. या नव्या युगात केवळ चिप्स बनवणारेच नव्हे, तर संगणकीय क्षमता आणि कृत्रिम बुद्धिमत्तेवर प्रभुत्व मिळवणारे देशच उद्याच्या जगाचे नेतृत्व करतील. भारताला त्या शर्यतीत आघाडी घेण्याची तयारी आजपासूनच आणि युद्धपातळीवर करावी लागणार आहे.

# पावसाच्या पार्श्वभूमीवर शासकीय यंत्रणा २४ बाय ७ 'अलर्ट मोड'वर ठेवा : मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

## राज्यातील पावसाच्या परिस्थितीचा मुख्यमंत्र्यांनी मंत्रालयातील आपत्ती व्यवस्थापन कक्षातून घेतला आढावा; अत्यावश्यक असल्याशिवाय दोन दिवस नागरिकांनी घराबाहेर पडू नये

दैनिक आपला विदर्भ

**मुंबई । प्रतिनिधी :** मुंबईसह किनारी भागातील जिल्ह्यात वाऱ्याचा ताशी वेग ५० ते ७० किलोमीटर प्रति तास असण्याची शक्यता आहे. यासोबतच आज दुपारी ३ ते ४.३० वाजे दरम्यान समुद्राला भरती येण्याची शक्यताही आहे. या पार्श्वभूमीवर सर्व संबंधित यंत्रणांनी २४ बाय ७ अलर्ट मोडवर राहून आपत्कालीन परिस्थिती आल्यास तातडीने मदत कार्य करावे, असे निर्देश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिले आहे. राज्यभरात मुसळधार पाऊस पडण्याची शक्यता असल्याने आज आणि उद्या अत्यावश्यक काम असल्याशिवाय नागरिकांनी घराबाहेर पडू नये , असे आवाहनही मुख्यमंत्र्यांनी केले.

राज्य आपत्ती नियंत्रण कक्षामध्ये आयोजित बैठकीत राज्यातील पावसामुळे निर्माण झालेल्या परिस्थितीचा आढावा मुख्यमंत्री फडणवीस यांनी घेतला. यावेळी आपत्ती व्यवस्थापन मंत्री गिरीश महाजन उपस्थित होते.

मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले, हवामान विभागाच्या अंदाजानुसार मुंबई आणि किनारी भागात सोसाट्याच्या वाऱ्यासह पाऊस अपेक्षित आहेत. अपेक्षित उच्च भरतीच्या पार्श्वभूमीवर राज्य आपत्ती प्रतिसाद दल व राष्ट्रीय आपत्ती प्रतिसाद दल यांना 'अलर्ट मोड'वर ठेवण्यात आले आहेत. पुराची परिस्थिती निर्माण झाल्यास तातडीने 'एसडीआरएफ' आणि 'एनडीआरएफ'



ची पथके रवाना करण्यात यावी. आपत्कालीन परिस्थितीमध्ये नागरिकांना तातडीने मदत मिळेल, याची काळजी घ्यावी.

मुंबई-अहमदाबाद राष्ट्रीय महामार्गावरील अडथळे तात्काळ दूर करून वाहतूक सुरळीत करण्यासाठी राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरण यांच्याशी समन्वय साधून महामार्गावरील मलबा हटविण्यात यावा. पावसाची परिस्थिती लक्षात घेऊन संभाव्य दरड कोसळणाऱ्या ठिकाणी पथके सज्ज ठेवावीत. तसेच मुंबई-गोवा महामार्गावर यावेळी अनपेक्षित ठिकाणी दरडी कोसळण्याच्या घटना घडलेल्या आहेत. त्यामुळे संबंधित यंत्रणांनी सज्ज राहून दरडीचा मलबा तात्काळ हटविण्यात यावा. कुठल्याही परिस्थितीत वाहतुकीचे कोंडी होणार नाही, याची दक्षता घेण्यात यावी, असेही मुख्यमंत्री यावेळी म्हणाले.

नाशिक व त्रंबकेश्वर परिसरातील पर्यटकांची विशेष खबरदारी घ्यावी

मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले, अरबी समुद्रावर बनत असलेल्या तीव्र कमी दाबाच्या क्षेत्रामुळे नाशिक जिल्ह्याच्या बऱ्याचशा भागात उद्या ढगफुटी सदृश्य पाऊस होण्याची दाट शक्यता आहे.

हा पाऊस बऱ्यापैकी त्र्यंबकेश्वर व आजूबाजूच्या परिसरात पडण्याची शक्यता वर्तविण्यात आली असून सुमारे ३०० मिलिमीटर पाऊस अपेक्षित आहे. अशा परिस्थितीत नाशिक जिल्हा प्रशासनाने सज्ज राहून सखल भागात पाणी साचणार नाही, यासाठी उपाययोजना कराव्यात. कुठेही जीवित हानी होणार नाही, याबाबतही दक्ष रहावे.

ही परिस्थिती लक्षात घेता नाशिक व त्र्यंबकेश्वर परिसरात असलेल्या पर्यटकांच्या सुरक्षेसाठी विशेष खबरदारी घेण्यात यावी. बंद होऊ शकणारे रस्ते, दरडी कोसळण्याची ठिकाणी अशा सर्वंकष बाबींचा विचार करून पर्यटकांना सुरक्षित स्थळी हलविण्यात यावे. पुढील काही दिवस त्र्यंबकेश्वर परिसरामध्ये पर्यटकांनी जावू नये, असे आवाहनही मुख्यमंत्र्यांनी केले.

सर्व यंत्रणांनी अत्यंत सतर्क राहून अडकलेल्या नागरिकांच्या सुटकेसाठी तात्काळ कार्यवाही करावी, असे निर्देश दिले. पुढील ४८ तास 'शून्य बळी' हे उद्दिष्ट ठेवून कमाल दक्षता बाळगावी, असेही मुख्यमंत्र्यांनी स्पष्ट केले. मुंबई शहरात एका महिन्याच्या सरासरी इतका पाऊस अवघ्या चार दिवसांत नोंदवण्यात आला आहे. विशेषतः भरतीच्या काळात अशा परिस्थितीत मोठ्या प्रमाणावर आपत्तीजन्य स्थिती निर्माण होण्याची शक्यता असते. यंत्रणांच्या प्रयत्नांमुळे पाणी साचण्याची समस्या मोठ्या प्रमाणात नियंत्रित ठेवण्यात यश आले आहे. काल मुंबई शहरात ताशी ५० किलोमीटर वेगाने वारे वाहताना निदर्शनास आले. यामुळे शहरात मोठ्या प्रमाणावर झाडे कोसळण्याच्या घटना घडल्या. साधारणपणे संपूर्ण चार महिन्यांच्या मान्सूनमध्ये जितकी झाडे पडतात, त्यापैकी जवळपास ३०० झाडे एकाच दिवशी पडली आहेत, असे मुख्यमंत्र्यांनी प्रसार माध्यमांशी बोलताना सांगितले.

येत्या तीन दिवसांत, म्हणजे ८ जुलैच्या रात्रीपर्यंत, हवामानाची तीव्रता कायम राहण्याचा अंदाज आहे. सर्व जिल्हा प्रशासनाने सतर्क रहावे. दरम्यान, भूस्खलनाच्या घटनाही समोर आल्या आहेत. मुंबईपुणे द्रुतगती मार्गावरही मोठ्या प्रमाणावर भूस्खलन होऊन मोठ्या प्रमाणात माती व दगड रस्त्यावर आले आहेत. संबंधित यंत्रणा मार्ग मोकळा करून वाहतूक पूर्ववत करण्यासाठी युद्ध पातळीवर काम कराव, अशा सूचनाही मुख्यमंत्री फडणवीस यांनी दिल्या.

अशा परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर खबरदारीचा उपाय म्हणून नागरिकांनी 'वर्क फ्रॉम होम'चा अवलंब करावा. खाजगी आस्थापनांनी मानवतेच्या दृष्टिकोनातून कर्मचाऱ्यांना वर फ्रॉम होम जे सवलत द्यावी असे न करणाऱ्या आस्थापनांवर कारवाई करण्यात येईल, असा इशाराही मुख्यमंत्र्यांनी यावेळी दिला.

बैठकीत मुख्यमंत्र्यांनी दूरदृश्य संवाद प्रणाली द्वारे विभागीय आयुक्त यांच्याकडून संबंधित विभागाचा आढावा घेतला. बैठकीस मुख्य सचिव राजेश अग्रवाल, अपर मुख्य सचिव (गृह) मनीषा म्हैसकर, पोलिस महासंचालक सदानंद दाते, अपर मुख्य सचिव (सार्वजनिक बांधकाम) मिलिंद म्हैसकर, अपर मुख्य सचिव (महसूल) विकास खारगे, बृहन्मुंबई महापालिका आयुक्त अश्विनी भिडे, प्रधान सचिव (नगरविकास) के. एच. गोविंदराज, प्रधान सचिव (जलसंपदा) एकनाथ डवले,मदत व पुनर्वसन विभागाच्या प्रधान सचिव विनिता वेद सिंगल, प्रधान सचिव तथा महासंचालक ब्रिजेश सिंह, सचिव (आरोग्य) ई. रविंद्रन, संचालक श्री. चव्हाण आदी उपस्थित होते.

थोडक्यात पावसाची माहिती

आज ६ जुलै रोजी सकाळी ११ वाजेपर्यंत मुंबई उपनगर जिल्ह्यात १५१.२ मिलिमीटर पाऊस झाला असून मुंबई शहरामध्ये १०५ मिलीमीटर पावसाची नोंद झाली आहे.

रायगड जिल्ह्यात २३६.६, ठाणे जिल्ह्यात १५८.७ रत्नागिरीमध्ये १५२.३ पावसाची नोंद झाली आहे.

# धुळ्यात बस अन् ट्रेलरची धडक, ड्रायव्हर फरार; सुदैवाने प्रवासी बचावले, बसचालक गंभीर जखमी

**धुळे । प्रतिनिधी :** राज्यात एकीकडे पावसाचा जोर वाढला असून मुंबई, पुण्यासह उपनगरात पावसाची धुव्वाधार बॅटिंग पाहायला मिळत आहे. त्यातच, शिंदखेडा तालुक्यातील चिमठाणे गावाजवळ धुळेनंदुरबार मार्गावरील एसटी बस आणि मालवाहू ट्रेलर यांच्यात भीषण अपघात झाला. या अपघातात बस चालक अनिल देवरे यांच्या दोन्ही पायांना गंभीर दुखापत झाली असून बसमधील सुमारे ३० ते ४० प्रवाशांचे प्राण थोडक्यात बचावले. अपघातानंतर ट्रेलर चालक घटनास्थळावरून फरार झाला असून त्याचा शोध सुरू आहे.



प्राथमिक माहितीनुसार धुळेनंदुरबार एसटी बस धुळ्याकडून नंदुरबारच्या दिशेने जात असताना चिमठाणे गावाकडून येणाऱ्या मालवाहू ट्रेलरने बसला समोरून जोरदार धडक दिली. ट्रेलरची धडक इतकी भीषण होती की बसच्या पुढील भागाचे मोठे नुकसान झाले आणि चालक गंभीर जखमी झाले आहेत. अपघात होताच परिसरातील नागरिकांनी तातडीने घटनास्थळी धाव घेत बचावकार्य सुरू केले. गावकऱ्यांनी बसमधील प्रवाशांना सुखरूप बाहेर काढत मोठा अनर्थ टाळला. जखमी चालकाला तातडीने उपचारासाठी रुग्णालयात दाखल करण्यात आले. अपघातानंतर काही काळ परिसरात वाहतूकही विस्कळीत झाली होती.

चिमठाणे ते सोनगीर या मार्गावर राष्ट्रीय महामार्गाचे काम अनेक महिन्यांपासून सुरू आहे. मात्र, कामाची गती अत्यंत संथ असून अनेक ठिकाणी रस्ता अपूर्ण अवस्थेत आहे. पावसाळ्यामुळे रस्त्यावर चिखल, खड्डे आणि निसरडी परिस्थिती निर्माण होत असल्याने या मार्गावर वारंवार अपघात होत असल्याची नागरिकांची तक्रार आहे.

## आकांक्षा म्हणते... 'लग्नापूर्वी मी बायसेक्शुअल होते...'

अनुपमा' फेम गौरव खन्नाची पत्नी आणि अभिनेत्री आकांक्षा चमोला सध्या 'लॉक अप सीजन २' या रिलिटी शोमुळे प्रचंड चर्चेत आहे. नुकतेच तिने या शोमध्ये तिच्या वैयक्तिक आयुष्याबद्दल अनेक धक्कादायक खुलासे केले आहेत. काही दिवसांपूर्वीच तिने गौरव खन्नासोबत घटस्फोट घेत असल्याचे सांगितले होते, तर आता तिने स्वतःच्या लैंगिक ओळखीबाबत मोठा खुलासा केला आहे.

शोमधील स्पर्धक श्रेया कालराने आकांक्षाच्या 'बायसेक्शुअल' असण्याबाबत चर्चा केली होती. हा व्हिडीओ होस्ट फराह खान आणि रितेश देशमुख यांनी आकांक्षाला दाखवला, तेव्हा ती भावुक झाली. त्यानंतर आकांक्षाने स्वतः जाहीरपणे कबूल केले की, लग्नापूर्वी ती बायसेक्शुअल होती आणि काही मुलींसोबत तिचे रिलेशनशिपही होते. आकांक्षा म्हणाली की, तिला नेहमीच महिलांसोबत सुरक्षित वाटायचे. लोक याला 'बायसेक्शुअल' म्हणत असले, तरी ती याकडे फक्त एक भावनिक नाते म्हणून पाहते.

# प्लास्टिक कचरा व्यवस्थापन नियमांची प्रभावी अंमलबजावणी करा

## - मुख्य कार्यकारी अधिकारी गुलाब खरात यांचे निर्देश
## - उघड्यावर प्लास्टिक फेकल्यास होणार दंडात्मक कारवाई

दैनिक आपला विदर्भ

**बुलढाणा । प्रतिनिधी** : पर्यावरण संरक्षण व स्वच्छतेच्या दृष्टीने जिल्ह्यात प्लास्टिक कचरा व्यवस्थापन नियमांची प्रभावी अंमलबजावणी करण्याचे निर्देश मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद बुलढाणा गुलाब खरात यांनी परिपत्रकाद्वारे सर्वांना दिले आहेत. या मोहिमेअंतर्गत घनकचरा व्यवस्थापन नियम २०२६ चे काटेकोर पालन करणे व त्याचे उल्लंघन झाल्यास दंडात्मक कारवाई करण्याच्या स्पष्ट सूचना या परिपत्रकामध्ये आहेत. सदर परिपत्रक सर्व पंचायत समिती व ग्रामपंचायत यांना दिलेले आहे.

प्लास्टिक कचरा व्यवस्थापन नियमांनुसार जिल्ह्यातील सर्व ग्रामपंचायती, संबंधित यंत्रणांनी एकेरी वापरातील प्लास्टिकवर प्रभावी नियंत्रण ठेवणे, प्लास्टिक कचऱ्याचे स्रोतस्थानी वर्गीकरण, संकलन, पुनर्वापर व शास्त्रोक्त विल्हेवाट यावर विशेष भर द्यावा, असे निर्देश देण्यात आले आहेत.



तसेच नागरिकांमध्ये प्लास्टिकमुक्त जीवनशैलीबाबत जनजागृती करण्यासाठी विविध उपक्रम राबविण्यात यावेत. नियमांचे उल्लंघन करणाऱ्यांविरुद्ध प्लास्टिक कचरा व्यवस्थापन नियम व घनकचरा व्यवस्थापन नियम २०२६ नुसार आवश्यक ती दंडात्मक कारवाई करण्यात येणार आहे. मुख्य कार्यकारी अधिकारी गुलाब खरात यांनी सर्व गटविकास अधिकारी, ग्रामपंचायती, आणि संबंधित विभागांनी समन्वयाने काम करून जिल्हा प्लास्टिकमुक्त करण्यासाठी विशेष प्रयत्न करावेत, असे निर्देश दिले आहेत.

**ग्रामपंचायतच्या जबाबदाऱ्या**

- प्लास्टिक कचऱ्याचे स्त्रोतावर वर्गीकरण, संकलन साठवणूक व वाहतूक सुनिश्चित करणे.
- पुनर्वापर योग्य प्लास्टिक कचरा अधिकृतपणे प्रक्रिया केंद्राकडे पाठविणे.
- ग्रामस्थ, शाळा, बचत गट व इतर संस्थांमध्ये जनजागृती करणे.
- प्लास्टिक कचऱ्याचे उघड्यावर जाळपोळ होणार नाही याची खात्री करणे.
- सार्वजनिक ठिकाणी रस्त्यावर नाल्यात किंवा जलस्त्रोतांमध्ये प्लास्टिक कचरा टाकण्यास प्रतिबंध करणे.
- ग्रामीण भागात प्लास्टिक कचरा व्यवस्थापनासाठी योग्य व्यवस्था उभारणे व कार्यान्वित करणे.
- जत्रा, उत्सव, विवाह समारंभ, धार्मिक कार्यक्रम आयोजकांनी निर्माण झालेल्या प्लास्टिक कचऱ्याचे व्यवस्थापन करणे बंधनकारक आहे.
- दुकानदारांशी संवाद साधने - आठवडी बाजारात जाऊन कापडी पिशव्यांचा वापर वाढवण्यासाठी व्यापाऱ्यांची बैठक घेणे.
- स्वच्छता कर आकारणे.
- शाळकरी मुलांचा सहभाग वाढवणे.
- माहिती फलक लावून जाणीव जागृती करणे. उदा. प्लास्टिकमुक्त सुंदर गाव, हेच आमचे नाव प्लास्टिक बंदीचे उल्लंघन केल्यास दंडात्मक कारवाई करणे

**दंड :**

- सार्वजनिक ठिकाणी प्लास्टिक कचरा फेकल्यास १०० ते ५०० रुपये
- प्लास्टिक कचरा जाळल्यास ५०० ते २००० रुपये.
- अनधिकृतपणे प्लास्टिक कचरा टाकल्यास ५०० ते ५००० रुपये.
- बंदी घातलेला एकदाच वापराच्या प्लास्टिक वस्तूंचा वापर/ साठा/ विक्री केल्यास १००० ते ५००० रुपये दंड पुनरावृत्ती झाल्यास दुप्पट दंड.
- वारंवार नियम मोडल्यास २५००० दंड आणि तीन महिने कारावास.

प्लास्टिक कचरा व्यवस्थापन हे काटेकोरपणे करून आपण लवकरच जिल्हा प्लास्टिक मुक्त करूया असे आवाहन उपमुख्य कार्यकारी अधिकारी पाणीपुरवठा व स्वच्छता विभाग जिल्हा परिषद बुलढाणा सतीश देशमुख यांनी केले आहे.

DAINIK AAPLA VIDHARBH-Printed by Rameshwar Vishwanath Sakalkar & Published by DEVIDAS MADHAVRAO KHANPATE Printed at Shubham printing press near tahsil office Mehkar-443301 (M.S.) and Published at mehkar- malegaon road near polics Station Dongaon Dist. Buldana-443301 (Mah.) Editor DEVIDAS MADHAVRAO KHANPATE Mob.No.97672 33034 Title-Code:- MAHMAR52707

हे पत्र प्रकाशक, मालक देविदास माधवराव खनपटे यांनी शुभम प्रिंटिंग प्रेस तहसील कार्यालयाजवळ मेहकर जि. बुलडाणा-४४३३०१ (महा) येथे छापून मेहकर मालेगाव रोड पोलीस स्टेशन समोर डोणगाव, जि. बुलडाणा-४४३३०१ (महा) येथून प्रकाशित केले. मुद्रक रामेश्वर विश्वनाथ साकळकर, संपादक-देविदास माधवराव खनपटे मोबा.९७६७२ ३३०३४ पीआरबी कायद्यानुसार छापलेल्या मताशी सहमत असेलच असे नाही, वादविवाद फक्त मेहकर न्यायालया अंतर्गत, (टिप: प्रकाशित

# नांदेड-मुंबई व टनकपूर-नांदेड दरम्यान दोन नवीन एक्सप्रेस गाड्यांना हिरवा झेंडा

## टनकपूर पिलीभीत रेल्वे सेवेचा शाहजहानपूरपर्यंत विस्तार

दैनिक आपला विदर्भ

**नांदेड । प्रतिनिधी :** केंद्रीय रेल्वेमंत्री अश्विनी वैष्णव यांनी व्हिडिओ कॉन्फरन्सिंगद्वारे नांदेडमुंबई व टनकपूरनांदेड या दोन नवीन एक्सप्रेस गाड्यांना हिरवा झेंडा दाखवून शुभारंभ केला. तसेच टनकपूरपिलीभीत रेल्वे सेवेचा शाहजहानपूरपर्यंत विस्तारही करण्यात आला. या प्रसंगी महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस तसेच उत्तराखंडचे मुख्यमंत्री पुष्कर सिंह धामी यांनी व्हिडिओ संदेशाद्वारे उपस्थितांना संबोधित केले.



या निमित्ताने नांदेड, टनकपूर आणि पिलीभीत रेल्वे स्थानकांवर विशेष कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले. टनकपूर येथे केंद्रीय राज्यमंत्री रवनीत सिंह, अजय टम्टा तसेच इतर लोकप्रतिनिधी उपस्थित होते. पिलीभीत येथे केंद्रीय राज्यमंत्री जितीन प्रसाद व इतर मान्यवर उपस्थित होते. त्याचवेळी नांदेड रेल्वे स्थानकावर खासदार अशोकराव शंकरराव चव्हाण, नांदेड-वाघाळा महानगरपालिकेच्या महापौर मा. सौ. कविता संतोष मुळे, खासदार मा. डॉ. अजित माधवराव गोपछडे, खासदार मा. श्री. रवींद्र वसंतराव चव्हाण, खासदार मा. बळवंत बसवंत वानखेडे, विधान परिषदेचे सदस्य अमरनाथ अनंतराव राजूरकर तसेच इतर मान्यवर उपस्थित होते. दक्षिण मध्य रेल्वेचे महाव्यवस्थापक श्री. संजय कुमार श्रीवास्तव, नांदेड विभागाचे विभागीय रेल्वे व्यवस्थापक श्री. प्रदीप कामले तसेच इतर रेल्वे अधिकारीही या कार्यक्रमास उपस्थित होते.

उपस्थितांना संबोधित करताना केंद्रीय रेल्वेमंत्री मा. श्री. अश्विनी वैष्णव यांनी सांगितले की, टनकपूरनांदेड एक्सप्रेसची सुरुवात ही जनतेच्या दीर्घकाळापासूनच्या अपेक्षांची पूर्तता आहे. ही नवीन रेल्वे सेवा उत्तराखंड आणि महाराष्ट्र यांच्यातील रेल्वे संपर्क अधिक मजबूत करेल तसेच नांदेड येथील पवित्र तख्त सचखंड श्री हजूर साहिब गुरुद्वाराला जाणाऱ्या भाविकांसाठी मोठी सुविधा ठरेल. त्यांनी पुढे सांगितले की, नांदेडमुंबई एक्सप्रेसमुळे मराठवाडा परिसरातील, विशेषतः वाशीम, हिंगोली आणि बसमत येथील प्रवाशांना मुंबईशी अधिक सुलभ रेल्वे संपर्क उपलब्ध होईल.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली गेल्या १२ वर्षांत भारतीय रेल्वेने केलेल्या प्रगतीचा उल्लेख करताना त्यांनी सांगितले की, या कालावधीत ३७,००० किलोमीटरहून अधिक नवीन रेल्वेमार्ग टाकण्यात आले असून रेल्वे जाळ्याचे ९९.६ टक्के विद्युतीकरण पूर्ण झाले आहे. बुलेट ट्रेन प्रकल्प तसेच समर्पित मालवाहतूक मार्ग वेगाने प्रगतीपथावर असल्याचे त्यांनी नमूद केले. मध्यमवर्गीय आणि आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांना परवडणारा व सुरक्षित प्रवास उपलब्ध करून देण्यासाठी विविध राज्यांमध्ये सातत्याने नवीन रेल्वे सेवा सुरू करण्यात येत असल्याचे त्यांनी सांगितले. यावर्षी जून महिन्यापर्यंत उन्हाळी हंगामात १५,००० हून अधिक विशेष गाड्या चालविण्यात आल्या असून, दिवाळी आणि छठ उत्सवादरम्यान सुमारे १२,००० विशेष गाड्या चालविण्यात आल्याची माहितीही त्यांनी दिली.

महाराष्ट्राचे मुख्यमंत्री. देवेंद्र फडणवीस यांनी दोन्ही नवीन रेल्वे सेवांच्या प्रारंभाबद्दल जनतेचे अभिनंदन केले. त्यांनी सांगितले की, नांदेडमुंबई एक्सप्रेसमुळे मराठवाड्यातील विशेषतः बसमत, हिंगोली, वाशीम, अकोला आणि नांदेड जिल्ह्यांतील प्रवाशांना मुंबईसाठी थेट आणि सोयीस्कर रेल्वे संपर्क उपलब्ध होईल. तसेच टनकपूरनांदेड एक्सप्रेसमुळे उत्तराखंड व उत्तर प्रदेशातील भाविकांना नांदेड येथील पवित्र सचखंड गुरुद्वाराला जाणे अधिक सुलभ होईल.

उत्तराखंडचे मुख्यमंत्री पुष्कर सिंह धामी यांनी सांगितले की, टनकपूरनांदेड एक्सप्रेसमुळे श्रद्धा, पर्यटन आणि विकासाला चालना मिळून उत्तराखंड आणि महाराष्ट्र यांच्यातील संबंध अधिक दृढ होतील. ही नवीन रेल्वे सेवा महत्त्वाच्या स्थळांमधील संपर्क अधिक सक्षम करेल, असे त्यांनी नमूद केले.

केंद्रीय रेल्वे राज्यमंत्री रवनीत सिंह यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि केंद्रीय रेल्वेमंत्री अश्विनी वैष्णव यांचे जनतेच्या अपेक्षा पूर्ण करून या नवीन रेल्वे सेवा सुरू केल्याबद्दल आभार मानले. त्यांनी सांगितले की, टनकपूरनांदेड आणि नांदेडमुंबई एक्सप्रेसमुळे सांस्कृतिक आणि आध्यात्मिक संबंध अधिक दृढ होतील तसेच या भागातील जनतेला अधिक चांगली संपर्क सुविधा उपलब्ध होईल.

नांदेड रेल्वे स्थानकावरील कार्यक्रमात खासदार अशोकराव शंकरराव चव्हाण यांनी सांगितले की, या दोन नवीन रेल्वे सेवांमुळे नांदेड आणि मराठवाड्याचा देशातील प्रमुख शहरांशी रेल्वे संपर्क अधिक मजबूत होईल. गेल्या काही वर्षांत लोकांच्या सहकार्यामुळे आणि प्रभावी नेतृत्वामुळे नांदेड परिसरातील रेल्वे पायाभूत सुविधांमध्ये मोठा बदल झाल्याचे त्यांनी नमूद केले.

नांदेड-वाघाळा महानगरपालिकेच्या महापौर सौ. कविता संतोष मुळे यांनी सांगितले की, नांदेडमुंबई एक्सप्रेस विद्यार्थी, भाविक, व्यावसायिक आणि विविध क्षेत्रातील प्रवाशांसाठी विशेषतः लाभदायक ठरेल. या नवीन रेल्वे सेवांमुळे परिसराच्या सामाजिक व आर्थिक विकासालाही चालना मिळेल, असे त्यांनी सांगितले.

खासदार डॉ. अजित माधवराव गोपछडे यांनी मा. पंतप्रधान आणि मा. केंद्रीय रेल्वेमंत्र्यांचे नांदेडमुंबई व टनकपूरनांदेड या नवीन एक्सप्रेस गाड्या सुरू केल्याबद्दल आभार मानले. या गाड्यांमुळे नांदेडचा महाराष्ट्रातील तसेच उत्तर भारतातील महत्त्वाच्या शहरांशी संपर्क अधिक सुदृढ होईल, असे त्यांनी सांगितले.

खासदार रवींद्र वसंतराव चव्हाण यांनी सांगितले की, नांदेडमुंबई आणि नांदेडटनकपूर एक्सप्रेसमुळे नांदेडचा संपर्क आणि पर्यटनाला अधिक चालना मिळेल. नांदेड हे हैदराबाद, मुंबई आणि नागपूर यांना जोडणारे महत्त्वाचे केंद्र असल्याचे सांगून प्रवाशांच्या सोयीसाठी आणखी रेल्वे सेवा सुरू करण्याची त्यांनी मागणी केली.

यापूर्वी दक्षिण मध्य रेल्वेचे महाव्यवस्थापक संजय कुमार श्रीवास्तव यांनी स्वागतपर भाषण केले.

## महत्त्वाचे...

### चुनाभट्टीत झाड कोसळून संरक्षण भिंत खचली; चार ते पाच दुचाकींचे नुकसान




दैनिक आपला विदर्भ

**मुंबई । प्रतिनिधी :** मुंबईतील चुनाभट्टी विभागात चुनाभट्टी स्मशानभूमीलगत असलेल्या दफनभूमीची संरक्षण भिंत खचल्याने तेथील मोठे झाड कोसळल्याची घटना घडली. झाड कोसळल्यामुळे घटनास्थळी उभ्या असलेल्या चार ते पाच दुचाकींचे नुकसान झाले. घटनेची माहिती मिळताच एल विभागाचे वृक्ष अधिकारी आणि कर्मचारी घटनास्थळी दाखल झाले. त्यांनी कोसळलेल्या झाडाच्या फांद्या हटवून परिसर सुरक्षित करण्याचे काम पूर्ण केले. सुदैवाने या घटनेत कोणतीही जीवितहानी झालेली नाही.

### राज्यपालांचे संत गुलाबराव महाराज यांना अभिवादन



दैनिक आपला विदर्भ

**मुंबई । प्रतिनिधी :** प्रज्ञाचक्षू संत गुलाबराव महाराज यांच्या जयंती निमित्त राज्यपाल जिष्णु देव वर्मा यांनी महाराष्ट्र लोकभवन येथे गुलाबराव महाराजांच्या छायाचित्राला पुष्पांजली वाहून अभिवादन केले. यावेळी लोकभवनातील अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

### १२ तासांनंतर खवटीतील दरड हटली; मुंबई-गोवा महामार्गावर एकेरी वाहतूक सुरु

दैनिक आपला विदर्भ

**रत्नागिरी। प्रतिनिधी :** रत्नागिरी जिल्ह्यातील खेड तालुक्यातील खवटी येथे मुंबई-गोवा महामार्गावर रविवारी पहाटे कोसळलेल्या दरडीचा मलबा सुमारे १२ तासांच्या अथक प्रयत्नांनंतर एका मार्गिकेवरून हटविण्यात यश आले. त्यानंतर महामार्गावर एकेरी वाहतूक सुरू करण्यात आली असून दोन्ही बाजूंना अडकून पडलेली वाहने टप्प्याटप्प्याने सोडण्यात येत आहेत.रात्री अडीचच्या सुमारास मोठी दरड महामार्गावर कोसळल्याने मुंबई-गोवा महामार्गावरील दोन्ही मार्गिकांवरील वाहतूक पूर्णपणे ठप्प झाली होती. त्यामुळे महामार्गाच्या दोन्ही बाजूंना शेकडो वाहनांच्या लांबच लांब रांगा लागल्या होत्या. प्रवाशांना तब्बल १२ तास महामार्गावरच अडकून राहावे लागले.घटनेनंतर राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरण, प्रशासन, पोलीस तसेच यंत्रसामग्रीच्या मदतीने दरड हटविण्याचे काम युद्धपातळीवर हाती घेण्यात आले. सततच्या प्रयत्नांनंतर एका मार्गिकेवरील मलबा हटविण्यात यश आल्याने दुपारनंतर एकेरी वाहतूक सुरू करण्यात आली. त्यानंतर अडकून पडलेली वाहने नियोजनबद्ध पद्धतीने मार्गस्थ केली जात आहेत. दरम्यान, दुसऱ्या मार्गिकेवरील दरडीचा मलबा हटविण्याचे काम अद्याप सुरू असून महामार्ग पूर्णपणे वाहतुकीसाठी खुला करण्यासाठी यंत्रणा प्रयत्नशील आहे. नागरिकांनी आवश्यकतेशिवाय या मार्गावर प्रवास टाळावा आणि प्रशासनाच्या सूचनांचे पालन करावे, असे आवाहन करण्यात आले आहे.

### मुसळधार पावसामुळे विधानसभेचे कामकाज दिवसभराकरिता स्थगित

**मुंबई । प्रतिनिधी :** हरवला, हरवला, इन्फ्रामॅन हरवला असे नारे देत विधिमंडळाच्या अधिवेशनादरम्यान विरोधी पक्षाच्या आमदारांनी विधानभवनाच्या पायऱ्यांवर आंदोलन केलं. यावेळी विरोधकांच्या घोषणांनी परिसर दुमदुमून गेला होता. भारतीय जनता पक्ष आणि महायुती कमिशन घेऊन नागरिकांचा जीव घेत असल्याचा यावेळी आरोप विरोधकांनी केला.याविषयी बोलताना शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाचे आमदार अंबादास दानवे म्हणाले की, जीर्ण इमारतीचं ऑडिट करणं ही मुंबई महानगरपालिकेची जबाबदारी असते. मात्र, याकडं मुंबई महानगरपालिका प्रशासन आणि सत्ताधाऱ्यांनी संपूर्णत: दुर्लक्ष केलं आहे. मानखुर्दमध्ये झालेल्या घटनेला संपूर्णत: सत्ताधारीच जबाबदार आहेत. उद्धव ठाकरे आणि आदित्य ठाकरे यांनी इतके वर्ष मुंबई महानगरपालिकेत काय केलं? असा प्रश्न वारंवार विचारला जातो. मात्र, तुमच्या सत्तेत तुम्ही काय दिवे लावले? असा सवाल यावेळी अंबादास दानवे यांनी मुंबई महानगरपालिकेच्या प्रशासनाला आणि सत्ताधाऱ्यांना विचारला.

## मुंबई पाऊस दुर्घटना प्रकरण : अमित साटम यांच्या विरोधात मनसेचे 'जोडे मारो' आंदोलन

**मुंबई । प्रतिनिधी :** मुंबईत गेल्या दोन दिवसांपासून सुरू असलेल्या मुसळधार पावसामुळे झाडं, घरांच्या भिंती आणि चाळ कोसळून जीवितहानी झाली. या पार्श्वभूमीवर महाराष्ट्र नवनिर्माण सेनेने आज राज्य सरकार आणि प्रशासनाविरोधात आक्रमक आंदोलन छेडले. दादरसह मुंबईतील विविध भागांत मनसे कार्यकर्त्यांनी भाजपा आमदार अमित साटम यांच्या छायाचित्राला प्रतिकात्मक 'जोडे मारो' आंदोलन करत सरकारच्या निष्काळजी कारभाराचा निषेध व्यक्त केला. यावेळी मनसे कार्यकर्त्यांकडून सरकारविरोधात जोरदार घोषणाबाजी करण्यात आली.

प्रशासनाच्या हलगर्जीपणामुळे मुंबईकरांचे बळी : पावसाळा सुरू होण्यापूर्वी दरवर्षी झाडांची छाटणी, धोकादायक इमारतींचं सर्वेक्षण, नालेसफाई आणि आपत्कालीन उपाययोजनांचे दावे केले जातात. मात्र प्रत्यक्षात प्रशासनाच्या हलगर्जीपणामुळे मुंबईकरांना जीव गमवावा लागत आहे. पावसामुळे झालेल्या प्रत्येक मृत्यूसाठी सरकार आणि संबंधित यंत्रणा जबाबदार असल्याचा आरोप करत दोषींवर कठोर कारवाई करण्याची मागणी मनसे आंदोलनकर्त्यांनी केली.

## वसई-विरारला पुराचा वेढा; सलग ६ दिवसांपासून पूरस्थिती, जनजीवन पूर्णपणे विस्कळीत

दैनिक आपला विदर्भ

**वसई । प्रतिनिधी :** वसई-विरार शहरात मागील सहा दिवसांपासून सुरू असलेल्या मुसळधार पावसामुळे पूरस्थिती निर्माण झाली असून, रविवारी सायंकाळपासून सुरू झालेल्या वादळी वाऱ्यासह मुसळधार पावसाने शहराला अक्षरश: वेढा घातला आहे. सोमवारीही दिवसभर पावसाचा जोर कायम राहिल्याने संपूर्ण जनजीवन पूर्णपणे विस्कळीत झाले आहे. २४ तासांत शहरात तब्बल २०३ मिमी पावसाची नोंद झाली असून, अनेक मुख्य रस्ते आणि निवासी भाग पाण्याखाली गेल्याने नागरिकांचे प्रचंड हाल होत आहेत.

अतिवृष्टीमुळे विरार, नालासोपारा आणि वसईतील प्रमुख भागांना तलावाचे स्वरूप आले आहे. विरार ग्लोबल सिटी, गोकुळ टाऊनशिप, म्हाडा परिसर, पुष्पानगर, जुने विवा विद्यालय, विराट नगर, बोळींज रस्ता, महापालिका मुख्यालय परिसर आणि चंदनसार भागात मोठ्या प्रमाणावर पाणी साचले आहे. स्टेशन रोड, तुळींज रस्ता, नगिनदास पाडा, विजय नगर, वाकणपाडा, धानिव बाग, गालानगर आणि एसटी डेपो परिसर जलमय झाले आहेत.वसई देवतलाव, सागरशेत, चुळणे, माणिकपूर, भुईगाव, सनसिटी गास, अर्नाळा रस्ता, गिरीज तसेच पूर्वेकडील मधुबन, सातीवली, वसंत नगरी रस्ता, रेंज नाका आणि एव्हरशाईन भागात पाण्याचा वेढा आहे. नायगाव पूर्व-पश्चिम आणि चिंचोटी, कामण-भिवंडी रस्त्यावर पाणी साचल्याने वाहतूक पूर्णपणे ठप्प झाली आहे. तर मुंबई अहमदाबाद महामार्गावर वसई फाटा, ससूनवघर अशा भागात पाणी साचले आहे. ग्रामीण भागातील चांदीप, पारोळ यासह अनेक भागांत पाणी साचले असून नदी-नाल्यांना पूर आला आहे. या पुरामुळे अनेक सोसायट्यांच्या तळमजल्यावरील घरांमध्ये आणि दुकानांमध्ये पाणी शिरल्याने व्यापाऱ्यांचे व नागरिकांचे मोठे आर्थिक नुकसान झाले आहे.

## अमरावती जिल्ह्यातील मजिप्रा, जलजीवन मिशनच्या कामांना गती द्या- मंत्री गुलाबराव पाटील यांचे निर्देश

दैनिक आपला विदर्भ



**मुंबई। प्रतिनिधी :** अमरावती जिल्ह्यात उन्हाळ्यामध्ये विविध गावांना टँकरने पाणीपुरवठा करावा लागतो. अचलपूर, चांदूरबाजार तालुक्यातील २३ गावांना पाण्याचे स्त्रोत जवळ नसल्याने १५ किमीवरून पाणी आणावे लागते. नागरिकांना पिण्याच्या पाण्याची सोय होण्यासाठी महाराष्ट्र जीवन प्राधिकरण आणि जल जीवन मिशनमधील प्रलंबित कामांना गती द्यावी, असे निर्देश पाणीपुरवठा व स्वच्छतामंत्री गुलाबराव पाटील यांनी दिले. मंत्रालयात आयोजित आढावा बैठकीत मंत्री पाटील बोलत होते. आमदार बच्चू कडू, महाराष्ट्र जीवन प्राधिकरणचे सदस्य सचिव अमगोथू रंगानायक, उपसचिव मंत्रा मानकामे, मजिप्राचे अधीक्षक अभियंता अजय सिंह, मजिप्राचे अमरावतीचे अधीक्षक अभियंता संतोष गव्हाणकर, कार्यकारी अभियंता विवेक सोळंके, अमरावती जिल्हा परिषदेच्या कार्यकारी अभियंता स्नेहा धावडे यांच्यासह वरिष्ठ अधिकारी तर अमरावतीचे मुख्य कार्यकारी अधिकारी सत्यम गांधी हे दूरदृश्य प्रणालीद्वारे यावेळी उपस्थित होते. मंत्री पाटील यांनी सांगितले की, चिखलदऱ्याच्या ग्रामीण भागातील ३६ गावांना आजही टँकरने पाणीपुरवठा होतो, ही गंभीर बाब आहे. मजिप्रा, जलजीवन मिशन योजना निधीअभावी रखडू देवू नका. दुर्गम भागातील पाणीपुरवठ्याला प्राधान्य द्या. मेळघाटातील योजना आदिवासी आणि भौगोलिक परिस्थिती लक्षात घेवून जास्तीत जास्त निधी मिळण्यासाठी प्रयत्न करावेत. अचलपूर आणि चांदूरबाजार भागातील काही गावे पादेशिक पाणीपुरवठा योजनांमधून सुटलेली आहेत. गावांच्या मागणीनुसार सद्य:वस्तुस्थितीचे पुन्हा सर्वेक्षण करून १५ दिवसात अहवाल सादर करावा, त्यानंतर त्या गावांचा मजिप्रा योजनेत समावेश करावा, असे निर्देश संबंधित अधिकाऱ्यांना दिले.

अचलपूर तालुक्यातील २४ गावातील जलजीवन मिशनची ८० टक्के; तर चांदूरबाजारमधील कामे ९८ टक्के पूर्ण झाली आहेत. यामधील ८३ गावात पाणीपुरवठा सुरू झाला आहे. मात्र ८ ते १० गावात योजना पूर्ण होवूनही पाण्याचे स्त्रोत उपलब्ध नसल्याने टँकरद्वारे पाणीपुरवठा सुरू आहे. पाण्याचे स्त्रोत जवळचे शोधण्याऐवजी दूरचे शोधून पाणीपुरवठा करण्याच्या सूचनाही मंत्री पाटील यांनी दिल्या.

मजिप्राच्या योजना त्वरित पूर्ण करून काही गावांचे स्थलांतर थांबवावे. आदिवासी, दुर्गम भाग, व्याघ्र प्रकल्प याबाबतच्या अडचणी समजून केंद्राच्या निधीची वाट न पाहता राज्य शासनाने उपाययोजना करण्याची मागणी आमदार श्री. कडू यांनी केली.

# विशेष सखोल मतदार पुनरीक्षण मोहिमेला वेग

## जिल्हाभर बीएलओंकडून घरोघरी पडताळणी; नागरिकांनी अचूक माहिती देण्याचे प्रशासनाचे आवाहन

दैनिक आपला विदर्भ

**बुलढाणा । प्रतिनिधी :** भारत निवडणूक आयोगाच्या निर्देशानुसार जिल्ह्यात सुरू असलेल्या विशेष सखोल मतदार यादी पुनरीक्षण मोहिमेला वेग आला असून, मतदान केंद्रस्तरीय अधिकारी (बीएलओ) जिल्हाभर घरोघरी भेट देऊन मतदारांची माहिती पडताळण्याचे काम नियोजनबद्ध पद्धतीने करत आहेत. गणना प्रपत्र भरून घेण्यासह पात्र मतदारांची माहिती अचूकपणे नोंदविण्यावर भर दिला जात आहे.

जिल्हाधिकारी डॉ. प्रविणकुमार देवरे यांच्या मार्गदर्शनाखाली उपविभागीय अधिकारी, तहसीलदार, सहाय्यक मतदार नोंदणी अधिकारी, पर्यवेक्षक आणि बीएलओ यांच्या समन्वयातून ही मोहीम प्रभावीपणे राबविण्यात येत आहे. वरिष्ठ अधिकारी विविध भागांना भेटी देऊन मोहिमेचा आढावा घेत असून आवश्यक त्या सूचना देत आहेत.

मोहिमेदरम्यान बीएलओ नागरिकांच्या घरी जाऊन गणना प्रपत्र भरून घेत आहेत. नागरिकांनी आवश्यक कागदपत्रे उपलब्ध करून देत अचूक माहिती द्यावी तसेच प्रपत्रातील माहितीची खातरजमा करून प्रशासनाला सहकार्य करावे, असे आवाहन करण्यात आले आहे.

मतदार यादी जितकी अचूक आणि अद्ययावत, तितकी लोकशाही अधिक सक्षम होते. त्यामुळे विशेष सखोल पुनरीक्षण मोहिमेत प्रत्येक पात्र मतदाराने सक्रिय सहभाग नोंदवून प्रशासनाला सहकार्य करावे, असे आवाहन जिल्हाधिकारी डॉ. प्रविणकुमार देवरे यांनी केले आहे.






ज्या नागरिकांना ऑनलाइन पद्धतीने माहिती सादर करावयाची आहे, त्यांच्यासाठी ईसीआयनेट ॲप तसेच : https://voters.eci.gov.in हे संकेतस्थळ उपलब्ध करून देण्यात आले आहे. या माध्यमातूनही गणना प्रपत्र भरता येत असून आवश्यकतेनुसार संबंधित बीएलओ किंवा मतदार नोंदणी कार्यालयाकडून मार्गदर्शन मिळू शकते.

अचूक, अद्ययावत आणि विश्वासार्ह मतदार यादी तयार करण्यासाठी ही मोहीम महत्त्वाची असल्याने प्रत्येक पात्र मतदाराने त्यात सक्रिय सहभाग नोंदवून लोकशाही प्रक्रियेला अधिक बळकटी द्यावी, असे आवाहन जिल्हा प्रशासनाने केले आहे.

## वृत्तविशेष...

### ना मागे जाईना, ना पुढे येईना.... मनोरी किनाऱ्यालगत खडकात कार्गो जहाज अडकले, जहाज कुठले ते ही कळेना!

दैनिक आपला विदर्भ

**पुणे । प्रतिनिधी** : मुंबईतील गोराई पोलीस ठाण्याच्या हद्दीतील मनोरी बंदर परिसरात, हिंदू स्मशानभूमीपासून सुमारे २०० ते २५० मीटर अंतरावर एक कार्गो जहाज खडकात अडकल्याची घटना समोर आली आहे. या घटनेची माहिती मिळताच गोराई पोलिसांनी तातडीने घटनास्थळी धाव घेतली असून विविध सागरी सुरक्षा यंत्रणांना सतर्क करण्यात आले आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, घटनास्थळी पाहणी केली असता जहाज भरकटलेल्या अवस्थेत खडकात अडकलेले दिसून आले. जहाजावर कोणत्याही व्यक्तीची हालचाल आढळली नाही. तसेच जहाजावर नाव किंवा ओळख पटेल अशी कोणतीही स्पष्ट निशाणी अथवा क्रमांक दिसून आला नाही.स्थानिक मच्छीमार आकाश बंदरकर यांनी पोलिसांना सांगितले की, संबंधित जहाज अनोळखी असून त्या भागातील खडकांची माहिती नसल्याने ते खडकात अडकले असावे. सध्या सुरू असलेली अतिवृष्टी, समुद्रातील उंच लाटा आणि वेगवान वाऱ्यांमुळे लहान बोटीने जहाजापर्यंत पोहोचणे धोकादायक असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले.

# बुलढाणा पोलिसांची दमदार कामगिरी; ७.५० लाखांचे ५० हरवलेले मोबाईल मूळ मालकांच्या हाती

## तांत्रिक तपासाच्या आधारे गुन्हे अन्वेषण पथकाची यशस्वी मोहीम; मोबाईलधारकांकडून पोलिसांचा सत्कार






दैनिक आपला विदर्भ

**बुलढाणा । प्रतिनिधी** : बुलढाणा शहरासह जिल्ह्यात हरवलेल्या व चोरीला गेलेल्या मोबाईलचा शोध घेण्यात बुलढाणा शहर पोलिसांनी उल्लेखनीय यश मिळवले आहे. सुमारे ७ लाख ५० हजार रुपये किमतीचे ५० मोबाईल शोधून काढत ते त्यांच्या मूळ मालकांच्या स्वाधीन करण्यात आले. या कौतुकास्पद कामगिरीमुळे मोबाईलधारकांनी पोलिसांप्रती कृतज्ञता व्यक्त करत त्यांचा सत्कार केला.

बुलढाणा शहर पोलीस ठाण्याच्या हद्दीत मोबाईल हरवल्याच्या व चोरीच्या अनेक तक्रारी प्राप्त झाल्यानंतर जिल्हा पोलीस अधीक्षक निलेश तांबे यांच्या मार्गदर्शनाखाली आणि ठाणेदार संग्राम पाटील यांच्या नेतृत्वात शहर पोलीस ठाण्याच्या गुन्हे अन्वेषण पथकाने विशेष मोहीम राबविली. पथकप्रमुख रवी मोरे यांनी तांत्रिक विश्लेषण आणि आधुनिक तपास पद्धतींचा वापर करून विविध ठिकाणांहून मोबाईलचा शोध लावला.

शोधून काढण्यात आलेले ५० मोबाईल आज ठाणेदार संग्राम पाटील यांच्या हस्ते मूळ मालकांना परत करण्यात आले. हरवलेला मोबाईल पुन्हा मिळाल्याने नागरिकांच्या चेहऱ्यावर आनंद ओसंडून वाहत होता. यावेळी मोबाईलधारकांनी बुलढाणा पोलिसांचे आभार मानत त्यांच्या कार्याचे कौतुक केले.

या यशस्वी कारवाईमुळे बुलढाणा पोलिसांच्या तांत्रिक तपास कौशल्याची पुन्हा एकदा प्रचिती आली असून, नागरिकांचा पोलिसांवरील विश्वास अधिक दृढ झाला आहे.

## तृतीयपंथीयांना स्वयंरोजगारासाठी बीज भांडवल योजनेंतर्गत आर्थिक सहाय्य

दैनिक आपला विदर्भ

**मुंबई । प्रतिनिधी** : तृतीयपंथीयांच्या आर्थिक सक्षमीकरणासाठी सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागामार्फत बीज भांडवल योजना राबविण्यात येत आहे. या योजनेअंतर्गत स्वयंरोजगारासाठी तृतीयपंथीयांना आर्थिक सहाय्य उपलब्ध करून देण्यात येणार आहे.

इच्छुक तृतीयपंथीयांनी शासनाने विहित केलेल्या नमुन्यात दिलेल्या : https://tinyurl.com/22wpc5j2//./2252 लिंकवर जावुन अर्ज डाऊनलोड करुन अर्ज भरून आवश्यक कागदपत्रांसह संबंधित जिल्ह्याच्या सहाय्यक आयुक्त, समाजकल्याण कार्यालयात सादर करावा असे आवाहन सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाने केले आहे. या योजनेचा उद्देश तृतीयपंथीयांना स्वयंरोजगारासाठी प्रोत्साहन देणे, कौशल्य विकास व उद्योजकता प्रशिक्षणाद्वारे शाश्वत रोजगार निर्माण करणे तसेच त्यांचा आर्थिक, सामाजिक, शैक्षणिक आणि सांस्कृतिक विकास साधणे हा आहे. लघुउद्योग व सूक्ष्म व्यवसाय सुरू करण्यासाठी बीज भांडवल उपलब्ध करून देण्यात येणार आहे. योजनेअंतर्गत लाभार्थ्यांना लघु कर्ज (२५ हजार रुपये), मध्यम कर्ज (५० हजार रुपये) आणि दीर्घ कर्ज (२ लाख रुपये) अशा तीन प्रकारांत कर्ज उपलब्ध होईल. यामध्ये लाभार्थ्याचा ५ टक्के, शासनाचा ४५ टक्के आणि राष्ट्रीयकृत बँकेचा ५० टक्के आर्थिक सहभाग राहणार आहे. नियमित कर्जफेड करणाऱ्या लाभार्थ्यांना व्याजावर ३ टक्के सवलतही देण्यात येणार आहे.

योजनेसाठी अर्जदार हा महाराष्ट्राचा किमान १० वर्षांचा रहिवासी असावा, सक्षम प्राधिकाऱ्याने जारी केलेले तृतीयपंथीय ओळखपत्र असावे, वय १८ ते ५० वर्षांच्या दरम्यान असावे तसेच व्यवसाय करण्यास सक्षम असावा. यापूर्वी अन्य बीज भांडवल योजनेचा लाभ घेतलेला नसावा. विशेष म्हणजे या योजनेसाठी जामीनदार किंवा तारणाची आवश्यकता नाही.

भाजी स्टॉल, वडा-पाव किंवा ज्यूस सेंटर, चहा व स्नॅक्स सेंटर, बेकरी, झेरॉक्स व लॅमिनेशन सेंटर, बांगडी दुकान, पिठाची गिरणी, ब्युटी पार्लर, सलून, जनरल स्टोअर्स, स्टेशनरी, मोबाईल शॉपी, मिनी मालवाहतूक टेम्पो, मसाला निर्मिती, लॉन्ड्री तसेच प्लंबर, इलेक्ट्रिशियन आणि विविध इलेक्ट्रॉनिक उपकरणांच्या दुरुस्ती व्यवसायांसह अनेक स्वयंरोजगार उपक्रमांसाठी या योजनेअंतर्गत कर्ज उपलब्ध करून देण्यात येणार आहे.

अर्जासोबत अधिवास प्रमाणपत्र, तृतीयपंथीय ओळखपत्र, आधार कार्ड किंवा अन्य ओळखपत्र, व्यवसायाच्या जागेचा पुरावा, यंत्रसामग्रीचे कोटेशन, आवश्यकतेनुसार भाडेकरार, ना-हरकत प्रमाणपत्र, प्रतिज्ञापत्र आणि दोन पासपोर्ट आकाराचे फोटो जोडणे आवश्यक आहे.

## सुधारित प्रधानमंत्री पीक विमा योजनेसाठी ३१ जुलैपर्यंत अर्ज मागविले; शेतकऱ्यांनी लाभ घ्यावा: कृषि विभागाचे आवाहन

दैनिक आपला विदर्भ

**बुलढाणा । प्रतिनिधी** : खरीप हंगाम २०२६-२७ साठी सुधारित प्रधानमंत्री पीक विमा योजनेत सहभागी होण्यासाठी शेतकऱ्यांनी ३१ जुलै २०२६ पर्यंत अर्ज करावेत, असे आवाहन कृषी विभागाने केले आहे.

राज्य शासनाच्या ३ जुलै २०२६ रोजीच्या शासन निर्णयानुसार बुलढाणा जिल्ह्यात ही योजना Cup Cap Model (80:110) नुसार अधिसूचित क्षेत्रातील अधिसूचित पिकांसाठी राबविण्यात येत असून, खरीप २०२६ व रब्बी २०२६-२७ हंगामासाठी विमा कंपनीची एका वर्षासाठी नियुक्ती करण्यात आली आहे.

या योजनेचा मुख्य उद्देश नैसर्गिक आपत्ती, कीड व रोगांमुळे पिकांचे नुकसान झाल्यास शेतकऱ्यांना आर्थिक संरक्षण देणे, आधुनिक शेती तंत्रज्ञानाचा वापर करण्यास प्रोत्साहन देणे, संकटाच्या काळात आर्थिक स्थैर्य कायम ठेवणे तसेच कृषी क्षेत्रातील पतपुरवठा व अन्नसुरक्षा मजबूत करणे हा आहे. खरीप हंगाम २०२६ साठी बजाज जनरल इन्शुरन्स कंपनी लिमिटेड, पुणे यांची विमा कंपनी म्हणून नियुक्ती करण्यात आली असून, कंपनीचा टोल-फ्री हेल्पलाईन क्रमांक १४४४७ आहे.

योजनेत सहभागी होण्यासाठी Agristack Farmer ID असणे अनिवार्य करण्यात आले आहे. तसेच डिजिटल क्रॉप सर्व्हे (Digital Crop Survey) अंतर्गत पीक नोंदणी करणे बंधनकारक राहणार आहे. विमा अर्जासाठी किमान ०.१० हेक्टर क्षेत्राची अट लागू असून, बोगस किंवा फसवणुकीच्या उद्देशाने विमा घेतल्याचे आढळल्यास संबंधित अर्जदारास पीक विमा योजना तसेच कृषी विभागाच्या विविध डीबीटी योजनांचा लाभ पाच वर्षांसाठी बंद करण्यात येणार आहे.

ही योजना कर्जदार तसेच बिगर कर्जदार अशा दोन्ही प्रकारच्या शेतकऱ्यांसाठी ऐच्छिक आहे. अधिसूचित क्षेत्रातील अधिसूचित पिकांसाठी खातेदार, कुळाने किंवा नोंदणीकृत भाडेपट्टी करारावर शेती करणारे शेतकरी योजनेत सहभागी होऊ शकतात. मात्र भाडेपट्टीने शेती करणाऱ्या शेतकऱ्यांनी नोंदणीकृत भाडेकरार पीक विमा संकेतस्थळावर अपलोड करणे आवश्यक आहे.

योजनेअंतर्गत खरीप हंगामासाठी शेतकऱ्यांचा विमा हप्ता विमा रकमेच्या केवळ २ टक्के, रब्बीसाठी १.५ टक्के आणि नगदी पिकांसाठी ५ टक्के इतका निश्चित करण्यात आला आहे. सर्व अधिसूचित पिकांसाठी जोखीम स्तर ७० ठेवण्यात आला असून, उंबरठा उत्पादन मागील सात वर्षांतील सर्वोच्च उत्पादनाच्या पाच वर्षांच्या सरासरीच्या आधारे निश्चित करण्यात येणार आहे.

भात, सोयाबीन, कापूस आणि गहू या पिकांसाठी पीक कापणी प्रयोगातून मिळालेल्या उत्पादनाला ५० टक्के आणि अत्याधुनिक तंत्रज्ञानाद्वारे मिळालेल्या उत्पादनाला ५० टक्के भारांकन देऊन सरासरी उत्पादकता निश्चित केली जाणार आहे. पेरणीपासून काढणीपर्यंतच्या कालावधीत नैसर्गिक आपत्ती अथवा इतर कारणांमुळे उत्पादनात घट झाल्यास नियमानुसार नुकसानभरपाई देण्यात येणार आहे.

शेतकऱ्यांनी अर्ज भरण्यासाठी केवळ विमा हप्ता भरावा. सीएससी केंद्रधारकांना केंद्र शासनाने निश्चित केलेले मानधन विमा कंपनीमार्फत दिले जात असल्याने विमा हप्त्याव्यतिरिक्त कोणतेही अतिरिक्त शुल्क देऊ नये, असेही कृषी विभागाने स्पष्ट केले आहे.

पीक विमा योजनेत सहभागी होण्यासाठी शेतकरी ३१ जुलै २०२६ पर्यंत ऑनलाइन अर्ज करू शकतात. प्रति हेक्टर शेतकरी हिस्सा (विमा हप्ता) सोयाबीनसाठी १ हजार २५० रुपये, कपाशी १ हजार ३०० रुपये, तूर ९४० रुपये, मूग ७५ रुपये, उडीद ६७.५० रुपये, मका १०० रुपये याप्रमाणे आहे. कृषी विभागाने सर्व पात्र शेतकऱ्यांनी मुदतीपूर्वी अर्ज करून प्रधानमंत्री पीक विमा योजनेचा लाभ घ्यावा, असे आवाहन केले आहे.

## तेलबिया व कडधान्य प्रक्रिया उद्योगांना अनुदान; ऑफलाइन अर्ज आमंत्रित, प्रथम येणाऱ्यास प्रथम प्राधान्य

दैनिक आपला विदर्भ

**बुलढाणा । प्रतिनिधी** : जिल्ह्यातील सोयाबीन, तीळ व इतर तेलबिया तसेच तूर, मूग, उडीद, हरभरा आदी कडधान्य पिकांचे काढणीनंतर होणारे नुकसान कमी करून स्थानिक स्तरावर प्रक्रिया उद्योगांना चालना देण्यासाठी कृषी विभागाने महत्त्वाचा निर्णय घेतला आहे. केंद्र व राज्य शासनाच्या 'राष्ट्रीय खाद्यतेल अभियान-तेलबिया (NMEO-OS)' आणि 'कडधान्य आत्मनिर्भरता अभियान २०२६-२७' अंतर्गत प्रक्रिया युनिट्स, मिनी ऑईल मिल, गोदाम बांधकाम व कडधान्य प्रक्रिया-पॅकेजिंग युनिट्स उभारण्यासाठी लाखो रुपयांचे अनुदान उपलब्ध करून देण्यात आले असून पात्र लाभार्थ्यांकडून ऑफलाइन अर्ज मागविण्यात आले आहेत.

योजनेअंतर्गत २५० मेट्रिक टन क्षमतेच्या गोदाम बांधकामासाठी सुमारे २८.८० लाख रुपयांचा प्रकल्प खर्च निश्चित करण्यात आला आहे. यासाठी पात्र लाभार्थ्यांना प्रकल्प खर्चाच्या ५० टक्के किंवा कमाल १४.४० लाख रुपये इतके अनुदान दिले जाणार आहे. शेतकरी उत्पादक संस्था (एफपीओ/एफपीसी), सहकारी संस्था, सार्वजनिक व खासगी उद्योग तसेच समूह आधारित व्यवसाय संस्था या योजनेसाठी पात्र असून मूल्यसाखळी भागीदारांना प्राधान्य दिले जाणार आहे. लाभार्थ्यांची निवड 'प्रथम अर्ज करणाऱ्यास प्रथम प्राधान्य' या तत्त्वावर केली जाणार आहे.

तेलबिया प्रक्रिया उद्योगांसाठीही स्वतंत्र अनुदानाची तरतूद करण्यात आली आहे. १० टन प्रतिदिन क्षमतेच्या तेल काढणी युनिटसाठी प्रकल्प खर्चाच्या ३३ टक्के किंवा कमाल ९.९० लाख रुपये अनुदान मिळणार आहे. तसेच फिल्टर प्रेससह मिनी ऑईल मिलसाठी कमाल ४ लाख रुपये, तर फिल्टर प्रेसशिवाय मिनी ऑईल मिलसाठी कमाल ३ लाख रुपये अनुदान देण्यात येणार आहे. या अनुदानामध्ये केवळ यंत्रसामग्री व उपकरणांचा खर्च ग्राह्य धरला जाणार असून जमीन किंवा इमारत बांधकामाचा खर्च ग्राह्य धरण्यात येणार नाही.

कडधान्यांवर स्थानिक पातळीवर प्रक्रिया करून ब्रँडिंगला चालना देण्यासाठी कडधान्य प्रक्रिया व पॅकेजिंग युनिट्ससाठी प्रकल्प खर्चाच्या ३३ टक्के किंवा कमाल २५ लाख रुपये आर्थिक सहाय्य देण्यात येणार आहे. या योजनेत प्रक्रिया युनिटबरोबर साठवणूक सुविधेलाही अनुदान उपलब्ध असले तरी इमारत किंवा गोदाम बांधकामासाठीचे अनुदान एकूण पात्र अनुदानाच्या ३० टक्क्यांपेक्षा अधिक असणार नाही. एफपीओ, क्लस्टर स्तरावरील महासंघ, प्राथमिक कृषी पतसंस्था आणि २१ वर्षांवरील वैयक्तिक उद्योजक या योजनेसाठी पात्र असून युनिटची किमान क्षमता ३०० किलो प्रति तास असणे आवश्यक आहे.

दोन्ही योजनांमध्ये क्रेडिट लिंक बॅकएंडेड सबसिडी पद्धतीने अनुदान दिले जाणार असल्याने लाभार्थ्यांनी बँक कर्ज घेणे बंधनकारक आहे. तसेच प्रकल्प खर्चातील किमान १५ टक्के हिस्सा स्वतः उभारावा लागणार आहे. काम सुरू होण्यापूर्वी व पूर्ण झाल्यानंतर कृषी मॅपर पद्धारे जिओ-टॅगिंग करणे आवश्यक असून योजनेच्या माहितीचा फलक लावणे व ठरावीक कालावधीपर्यंत प्रकल्पाची देखभाल करणेही बंधनकारक आहे.

इच्छुक लाभार्थ्यांनी विहित नमुन्यातील ऑफलाइन अर्ज संबंधित तालुका कृषी अधिकारी कार्यालयात आवश्यक कागदपत्रे व जीएसटी नोंदणीकृत पुरवठादारांचे अधिकृत दरपत्रक जोडून सादर करावेत. प्राप्त अर्जांची तांत्रिक व आर्थिक छाननी जिल्हा तेलबिया अभियान समिती किंवा जिल्हा कार्यकारी समितीमार्फत करून अंतिम निवड केली जाणार आहे.

या योजनांमुळे जिल्ह्यातील तेलबिया व कडधान्य उत्पादक शेतकऱ्यांचे काढणीनंतरचे नुकसान कमी होऊन स्थानिक पातळीवर प्रक्रिया उद्योगांना चालना मिळेल तसेच शेतकऱ्यांच्या उत्पन्नात वाढ होण्यास मदत होईल. 'प्रथम येणाऱ्यास प्रथम प्राधान्य' या तत्त्वावर निवड होणार असल्याने पात्र एफपीओ, सहकारी संस्था व उद्योजकांनी तातडीने अर्ज सादर करावेत, असे आवाहन जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी संतोष डाबरे यांनी केले आहे.

## श्री संत गुलाबराव महाराज जयंतीनिमित्त मंत्रालयात अभिवादन

दैनिक आपला विदर्भ

**मुंबइ । प्रतिनिधी** : वेद, शास्त्र आणि भारतीय संस्कृतीचे अभ्यासक श्री संत गुलाबराव महाराज यांच्या जयंतीनिमित्त मंत्रालयात त्यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले.

मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव श्रीकर परदेशी यांनी श्री. संत गुलाबराव महाराज यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून आदरांजली वाहिली.

यावेळी सामान्य प्रशासन विभागाचे अवर सचिव रामदास कोळेकर, कक्ष अधिकारी निलेश हरड व संदेश उतेकर, तसेच सार्वजनिक बांधकाम विभागाचे सहायक कक्ष अधिकारी विजय शिंदे, अमोल चव्हाण आणि विनोद सोरटे यांनीही श्री. संत गुलाबराव महाराज यांच्या प्रतिमेस पुष्प अर्पण करून अभिवादन केले. मंत्रालयातील अधिकारी व कर्मचारी यावेळी उपस्थित होते.

## दारूबंदी विभाग झोपेत; आरेगावात पोलिसांची धाड, अवैध दारू विक्रीचा पर्दाफाश

दैनिक आपला विदर्भ

**मेहकर । प्रतिनिधी** : आरेगाव (ता. मेहकर येथे सुरू असलेल्या अवैध देशी दारू विक्रीवर डोणगाव पोलिसांनी धडक कारवाई करत ३,६२० रुपयांचा मुद्देमाल जप्त केला असून एका आरोपीला अटक केली आहे. विशेष म्हणजे, ही कारवाई पोलिसांनी केली असताना अवैध दारू विक्री रोखण्याची जबाबदारी असलेला दारूबंदी विभाग मात्र निष्क्रिय असल्याची चर्चा परिसरात रंगली आहे.

गोपनीय माहितीच्या आधारे डोणगाव पोलिसांनी रविवारी (दि. ६) दुपारी साडेतीनच्या सुमारास आरेगाव येथे पंचांसमक्ष दारूबंदी कायद्यांतर्गत धाड टाकली. यावेळी विकास मधुकर सदावर्ते (वय ४७, रा. आरेगाव, ता. मेहकर) हा कोणत्याही परवान्याशिवाय अवैधरित्या देशी दारूची विक्री करताना रंगेहात आढळून आला.

कारवाईदरम्यान बॉबी संत्रा कंपनीच्या १८० मिलीच्या ४५ सीलबंद देशी दारूच्या बाटल्या (किंमत ३,६०० रुपये) तसेच दारू वाहतुकीसाठी वापरण्यात आलेली वायरची थैली (किंमत २० रुपये) असा एकूण ३,६२० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला.

ही कारवाई डोणगाव पोलीस ठाण्याचे ठाणेदार गणेश इंगोले यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस कॉन्स्टेबल पवन गाभणे, ज्ञानेश्वर घायाळ आणि चालक पोलीस कॉन्स्टेबल पुंडलिक वाळले यांच्या पथकाने केली. आरोपीविरुद्ध महाराष्ट्र दारूबंदी कायद्याच्या कलम ६५(ई) अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास सुरू आहे.

आरेगाव परिसरात अवैध दारू विक्री सुरू असल्याची माहिती पोलिसांना मिळते आणि ते तत्काळ कारवाई करतात; मात्र याच कामासाठी स्वतंत्र यंत्रणा असलेला दारूबंदी विभाग नेमका काय करत होता, असा प्रश्न नागरिक उपस्थित करत आहेत. काही दिवसांपूर्वीच ठाणेदार म्हणून गणेश इंगोले यांनी पदभार स्वीकारल्यानंतर अवैध धंद्यांविरोधात कारवाया होताना दिसत आहेत. त्यामुळे पोलिसांच्या सक्रियतेच्या तुलनेत दारूबंदी विभागाच्या कार्यक्षमतेवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले असून संबंधित



विभागानेही अशाच धडक कारवाया करण्याची अपेक्षा नागरिक व्यक्त करत आहेत.